follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 * वर्ष २५ * अंक २८६ सातारा * शनिवार * दि. २९ जून २०२४ * पाने ८ * किंमत ५ रू/





# अर्थसंकल्प महाराष्ट्राचा

## शेतकरी, महिला, युवकांसाठी योजनांची बरसात

# अजित पवार यांनी सादर केला निवडणूकपूर्व अर्थसंकल्प

विधानसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली असताना अर्थमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या सरकारचा शेवटचा अर्थसंकल्प सभागृहात सादर केला. अपेक्षेप्रमाणे या अर्थसंकल्पमध्ये शेतकरी, महिला युवकांसह समाजातील बहुतेक समाजघटकांसाठी योजनांची बरसात करण्यात आली आहे.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे बळकटीकरण**

कौशल्य विकास प्रकल्पांतर्गत राज्यातील ५०० औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांच्या दर्जात वाढ करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, जागतिक कौशल्य केंद्र अशा संस्थांचे बळकटीकरण करण्याबरोबरच उद्योजकता विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. गोवंडी येथे रोजगार प्रशिक्षण केंद्र उभारले गेले असून या ठिकाणी युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे युवकांचे प्रशिक्षण आणि संशोधन यासाठी पार्टी आणि सारथी अशा संस्थांनाही अधिक सशक्त केले जाणार आहे, असे पवार यांनी सांगितले.

### मागेल त्याला सौर पंप




शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी मोफत वीज उपलब्ध व्हावी यासाठी या अर्थसंकल्पात मागील त्याला सौर पंप ही योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत आठ लाख ५० हजार शेतकऱ्यांना मोफत सौर पंप उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच मुख्यमंत्री कृषी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना पंपासाठी साडेसात हॉर्स पॉवर पर्यंत वीज मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मागील हंगामात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील घडामोडींमुळे कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले. त्यांना दिलासा देण्यासाठी प्रती हेक्टर ५००० रुपये नुकसान भरपाई देणार असल्याचेही पवार यांनी जाहीर केले. कांदा आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी २०० कोटी रुपयांचा फिरता निधीही तयार केला जाणार आहे. त्याचप्रमाणे शेतमालाच्या साठवणुकीसाठी गाव तेथे गोदाम ही योजना अमलात आणली जाणार असून त्यासाठी पहिल्या टप्प्यात १०० गोदामांची दुरुस्ती केली जाणार आहे.

### पशुपालन व पूरक व्यवसायांना प्रोत्साहन



पशुपालन, दुग्ध व्यवसाय, पशुखाद्य उत्पादन, कुक्कुट पालन या व्यवसायात मोठा व्हावा असून युवकांनी त्याकडे आकर्षित व्हावे यासाठी प्रोत्साहन देण्याचे सरकारचे धोरण आहे. त्यासाठी दूध उत्पादकांना प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्यात येणार आहे. तसेच या क्षेत्रात नवे उद्योजक घडविण्यासाठी प्रोत्साहन पर योजना आखल्या जाणार आहेत, असे पवार यांनी सांगितले.

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना



समाजाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान मोठ्या प्रमाणावर आहे. सध्याच्या काळात अर्थार्जण आणि कुटुंबाचे पालन पोषण अशा दुहेरी जबाबदाऱ्या महिला मोठ्या प्रमाणावर पार पाडीत आहेत. अशा महिला वर्गाला आर्थिक स्वावलंबन आणि स्वातंत्र्य प्रदान करण्यासाठी २१ ते ६० वयोगटातील पात्र महिलांना शासनाच्या वतीने दरमहा पंधराशे रुपये देण्यात येतील. त्यासाठी ४६००० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून जुलै २०२४ पासून ही योजना सुरू करण्यात येणार आहे.

### दरवर्षी तीन सिलेंडर मोफत



घर कामासाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनाच्या प्रकारावर कुटुंबाचा कणा असलेल्या महिलेचे आरोग्य अवलंबून असते. एलपीजी गॅस हे सुरक्षित इंधन असल्यामुळे त्याचा लाभ महिलांना घेता यावा यासाठी पात्र कुटुंबांना वर्षातून तीन गॅस सिलेंडर मोफत देण्यात येणार आहेत, अशी घोषणा अजित पवार यांनी केली. या योजनेचा लाभ राज्यातील ५२ लाख १६ हजार ४०० कुटुंबांना मिळणार असून त्यामुळे पर्यावरण संरक्षणाच्या कामालाही हातभार लागणार आहे, असे पवार म्हणाले.

### 'पुंडलिक वरदा हरी विठ्ठल'चा जयघोष

महाराष्ट्राला उज्वल आध्यात्मिक आणि सामाजिक सांस्कृतिक परंपरा प्रदान करणारा वारीचा सोहळा सुरू होत आहे. याचे औचित्य साधून अजित पवार यांनी जगद्गुरु तुकोबारायांच्या अभंगासह पुंडलिक वरदा हरी विठ्ठल चा जयघोष करीत अर्थसंकल्पाच्या सादरीकरणाला सुरुवात केली. राज्याच्या या महान परंपरेचा जागतिक वारसा यादीत समावेश व्हावा यासाठी युनेस्को ला प्रस्ताव देणार असल्याचे त्यांनी सांगितले. वारीतील प्रत्येक दिंडीला वीस हजार रुपयांचे अनुदान, वारकऱ्यांची आरोग्य तपासणी आणि उपचार याबरोबरच वारीदरम्यान आवश्यक त्या सर्व सुविधा देणारा असल्याचे त्यांनी जाहीर केले.




### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना

राज्यातील युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण, प्रत्यक्ष रोजगार आणि उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध व्हावे यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची घोषणा पवार यांनी केली आहे. या योजनेअंतर्गत दरवर्षी ५० हजार युवकांना प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी प्रशिक्षण देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या विद्यार्थ्यांना शासनाकडून दरमहा दहा हजार रुपये विद्यावेतनही देण्यात येणार आहे.

# भांबवली वजराई धबधब्यावर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा वॉच!

## पर्यटकांच्या गर्दीवर नियंत्रण व हुल्लडबाज पर्यटकांना वचक!



**कास पठार :** कास परिसरात अधुनमधुन पावसाने चांगल्याप्रकारे हजेरी लावल्याने येथील निसर्गसौंदर्याचा बहर पाहता पर्यटक कास परिसरातील पर्यटनस्थळांवर गर्दी करत आहेत.भारतातील सर्वाधिक उंचीचा भांबवली वजराई धबधबा कोसळू लागल्याने अनेकांची पावले धबधब्याकडे वळत आहेत. पर्यटकांची गर्दी नियंत्रणाबाहेर जावून मोठयाप्रमाणावरील हुल्लडबाजपणा पाहता अपघाताचा धोका लक्षात घेवून यंदा भांबवली गावापासुन वजराई धबधब्यापर्यंत ठिकठिकाणी वनविभाग व संयुक्त वनव्यवस्थापन समिती भांबवली यांच्या संयुक्तविद्यमाने बहुतांश ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेत.

शुक्रवारपासुन भांबवली वजराई धबधबा हंगाम सुरू होणार असुन सुट्टीत, शनिवार,रविवारचा मुहूर्त गाठून येणाऱ्या अनेक हुल्लडबाज,स्टंट करणाऱ्यांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा चांगलाचा वचक बसणार असून गर्दी तसेच तरुणाई मस्ती न करता सुरक्षितपणे धबधब्यावर पर्यटनाचा आनंद घेणार आहेत.

मागील दोन आठवड्यातील मुसळधार पावसात भांबवली वजराई धबधबा प्रवाहीत झाला. पर्यटकांची पावले धबधब्याकडे फोटोसेशनसाठी वळू लागली. स्टंट, हुल्लडबाजातुन कोणतीही विपरीत घटना घडू नये तसेच शनिवार, रविवारी गर्दी लक्षात घेता सीसीटीव्ही कॅमेरे लावल्याने सुरक्षित पर्यटन होवून पर्यटक कुटुंबासमवेत पर्यटनाचा आनंद घेणार आहेत.

हुल्लडबाज,स्टंट करणाऱ्यांना चांगलीच धसकी बसणार असुन अविवेकी कृत्याला आळा बसणार आहे. धबधबा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद होण्याची जिल्हयात पहिलीच घटना असुन वनविभाग व संयुक्त वनव्यवस्थापन समितीने राबविलेल्या नाविण्यपुर्ण उपक्रमाचे सर्वस्तरातुन कौतुक होत आहे.

धबधब्यावर पर्यटकांची तुफान गर्दी पाहता तीन वर्षापुर्वी साताऱ्यातील तरुणीचा एकीवच्या धबधब्यावर दगडावरून पाय घसरून पडल्याने उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.तसेच गतवर्षी एकीव धबधबा परिसरात दोन गटातील वादातून दोघा जणांना जीव गमवावा लागला होता.या दुर्दैवी घटनेची पुनरावृत्ती कोठेही होऊ नये तसेच पर्यटकांची गर्दी नियंत्रणाबाहेर जावू नये यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून संभाव्य धोका टाळण्यासाठी भांबवली वजराई धबधबा सीसीटीव्हीच्या कक्षेत कैद होवून यामुळे पर्यटकांच्या गर्दीवर नियंत्रण व हुल्लडबाज पर्यटकांना वचक बसणार आहे.



**सुरक्षित पर्यटन झाल्यास भविष्यातील अपघात टाळता येतात.वजराई धबधबा परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमुळे स्टंट, हुल्लडबाज पर्यटकांवर चांगलाच वचक बसणार आहे.यामुळे पर्यटक कुटुंबासमवेत पर्यटनाचा आनंद सुरक्षितपणे घेऊ शकणार आहेत.तसेच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा बसणार आहे.**

**- डॉ. निवृत्ती चव्हाण, वनपरीक्षेत्र अधिकारी, सातारा.**

# यावर्षी तरी सुसह्य होणार का कोकणवासीयांचा प्रवास?

**नवी दिल्ली:** चाकरमान्यांचा प्रवास सुसह्य व्हावा यासाठी प्रदीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मुंबई गोवा महामार्गाचे काम कोकणवासीयांच्या जिव्हाळ्याचा सण असलेल्या गणेशोत्सवापूर्वी पूर्ण व्हावे, असे साकडे खासदार नारायण राणे यांनी महामार्ग व रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना घातले आहे.

गणेशोत्सव आणि होळी या सणांना कोकणवासीयांच्या दृष्टीने दिवाळीच्या सणाएवढेच महत्त्व आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई यासह राज्याच्या विविध भागातून चाकरमाने दरवर्षी गणेशोत्सवाला कोकणात सहकुटुंब हजेरी लावतात. मात्र, मुंबई गोवा महामार्गाची दुर्दशा झालेली असल्यामुळे कोकण वासियांना प्रवासात अनेक यातना सहन कराव्या लागतात.

वास्तविक नितीन गडकरी हे केंद्र सरकारमधील सर्वाधिक कार्यक्षम मंत्री म्हणून ओळखले जातात. त्यांनी आपल्या कार्यकाळात देशभरात वेगवान आणि दर्जेदार रस्त्यांचे जाळे उभे केले आहे. अनेक प्रचंड पूल आणि बोगदे त्यांच्या कार्यकाळात उभारले गेले आहेत. याच काळात वेगवान रस्ते उभारणीचे अनेक विक्रमही प्रस्थापित झाले आहेत. मात्र, तब्बल १७ वर्षापासून सुरू असलेले मुंबई गोवा महामार्गाचे काम आपल्याला अद्याप पूर्ण करता आले नाही, याची कबुली देऊन खुद्द गडकरी यांनी अनेकदा त्याबद्दल दिलगिरीही व्यक्त केली आहे.

यावर्षी तरी कोकणवासी यांचा प्रवास सुसह्य व्हावा, त्यासाठी महामार्गाचे काम जलद गतीने गणेशोत्सवापूर्वी पूर्ण करावे, या मागणीसाठी खासदार नारायण राणे यांनी गडकरी यांच्या नवी दिल्ली येथील निवासस्थानी त्यांची भेट घेऊन कोकणवासीयांच्या भावना त्यांच्या कानावर घातल्या. गडकरी यांच्या कार्यक्षम कारकिर्दीवर मुंबई गोवा महामार्गाच्या रूपाने उमटलेला काळा डाग यावर्षी तरी धुतला जाणार का आणि कोकणवासीयांचा प्रवास सुसह्य होणार का, याची उत्कंठा सर्वांना आहे.



# अजितदादांनी धरणग्रस्तांची चेष्टा करू नये : भारत पाटणकर

## पुनर्वसन प्रक्रिया योग्य पद्धतीने राबवण्याची केली मागणी

**सातारा :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि पुनर्वसन प्राधिकरणाचे अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोयना प्रकल्पग्रस्तांच्या नागरी सुविधांसाठी मोठा निधी जाहीर केला मात्र हा निधी जाहीर करण्यापूर्वी प्रकल्पग्रस्तांच्या वसाहती या स्वयंपुनर्वसित आहेत पुनर्वसन प्रक्रिया सरकारने वेळेवर राबवलेली नाही त्यामुळे नागरी सुविधा मिळायला अनंत अडचणी येत आहेत ही विदारक वस्तुस्थिती अजित दादा पवार यांच्या लक्षात येत नाही असे दिसते. यामुळे केवळ निधीची गाजरे दाखवून प्रकल्पग्रस्तांची त्यांनी चेष्टा करू नये अशी खरमरीत टीका श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉक्टर भारत पाटणकर यांनी पत्रकार परिषदेत केली.

यासंदर्भात प्रक्रिया योग्य राबवली न गेल्यास येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा त्यांनी दिला डॉक्टर भारत पाटणकर बोलताना पुढे म्हणाले कोयना प्रकल्पाच्या ६७ वर्षांनंतरही साडेतीन हजार खातेदारांना जमीन मिळालेली नाही. त्यातील ९०% खातेदार हे कामानिमित्त पुणे मुंबईला स्थलांतरित झालेले आहेत. ताकारी, टेंभू, म्हैसाळ आणि कृष्णा कोयना काठ अशा योजनांमधून कोयनेच्या पाण्यावर लाखो एकर बागायती शेती होते मात्र याला क्षेत्रातील जमीन न देता धरणग्रस्तांना डोंगरात आणि खडकाळ जमीन देण्यात आली. कोयना प्रकल्पग्रस्तांच्या ज्या वसाहती आहेत त्या स्वयं पुनर्वसित आहेत यामध्ये सरकारची जमीन नाही पुनर्वसन प्रक्रिया शासनाने वेळेवर न राबवल्यामुळे आता नागरी सुविधा देताना त्या वसाहती ताब्यात घेणे म्हणजे प्रचंड अडचणीची कामे आहेत त्यामुळे निधी मिळूनही तो खर्चला जाऊ शकणार नाही.

२००५ मध्ये प्रकल्पग्रस्तांनी आंदोलनाद्वारे राज्य शासनाकडून दीडशे कोटीचा निधी मिळवला त्यावेळी लोकशाही आघाडीच्या सरकारमध्ये स्वतः अजितदादा पवार होते आताही महायुतीच्या सत्तेमध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आहेत त्यांना कोणा प्रकल्पग्रस्तांची वस्तुस्थिती पूर्नवसनाचे मुद्दे माहीत नाही काय? कोयना प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसाहतींना नागरी सुविधांसाठी निधी जाहीर करणे म्हणजे प्रकल्पग्रस्तांना गाजर दाखवण्यासारखे आहे, प्रकल्पग्रस्तांची अशा पद्धतीने अभ्यासपूर्ण माहिती न घेता निधीची घोषणा करणे म्हणजे चेष्टा केल्याप्रमाणे आहे अजित दादांनी तसे वागू नये अशी टीका डॉक्टर पाटणकर यांनी केली.

गेल्या पाच वर्षांमध्ये महायुतीचे सरकार विशेषतः अजित पवार प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवू शकलेले नाही तारळी धरण प्रकल्पामध्ये ज्यांची संपूर्ण जमीन गेली त्यांना एक वर्षासाठी तीन हजार रुपये निर्वाह भत्ता देण्याची गोष्ट अजितदादांनी केली ही घोषणा सुद्धा अव्यवहार्य आहे, हा नियम एकाच धरणाला लागू का बऱ्याच धरणांच्या उभारणीमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी गेल्या आहेत निर्वाह भत्ता मिळायचा तर तो सर्वांनाच मिळाला पाहिजे अजितदादा पवार यांनी ठराविक विभागाला खास निधी देऊन खुश करण्याचा प्रयत्न केला आहे असा त्याचा अर्थ होतो .

कोयना धरणग्रस्तांनी २०१६ पासून पुनर्वसन पूर्ण होईपर्यंत तीन हजार रुपये निर्वाह भत्ता मागितला होता मात्र गेल्या आठ वर्षात तो मिळालेला नाही देवेंद्रजी फडणवीस मुख्यमंत्री असल्यापासून ही मागणी आहे याची अजित दादांना पूर्ण कल्पना आहे अजूनही अजितदादांनी कोयना धरणग्रस्तांच्या निर्वाह भत्त्याची मागणी मान्य केलेली नाही त्यांचीही असं वेदनशीलता खेदजनक आहे अशी नाराजी डॉक्टर पाटणकर यांनी व्यक्त केली.

# विधानसभेच्या निवडणुकांची अंतिम मतदार यादी २० ऑगस्टला प्रसिद्ध होणार

## जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची पत्रकार परिषदेत माहिती

सातारा : लोकसभा निवडणुकांची गडबड संपल्यानंतर सातारा जिल्हा प्रशासन विधानसभा निवडणुकांच्या तयारीला लागले आहे . सातारा जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकांची अंतिम मतदार यादी २० ऑगस्टला प्रसिद्ध होणार असून प्रारूप मतदार यादी २५ जुलैला प्रसिद्ध होणार आहे याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

येथील नियोजन भवनात वार्तालापा दरम्यान ते पुढे म्हणाले निवडणूक आयोगाच्या आदेशावरून जिल्हा प्रशासनाकडून मतदार यादी पुनर्नरीक्षण मोहीम हाती घेण्यात आली आहे. मंगळापासून ही मोहीम सुरू झाली आहे. यामध्ये मतदार यादीत नाव नोंदवणे, नाव पत्ता बदल, दुबार आणि मृत नाव वगळणे इत्यादी कामे करण्यात येणार आहे. जिल्ह्याची प्रारूप मतदार यादी २५ जुलैला प्रसिद्ध करण्यात येणार असून अंतिम मतदार यादी २० ऑगस्टला प्रसिद्ध केली जाणार आहे. येत्या तीन-चार महिन्यात राज्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत त्यामुळे केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार यादी अद्ययावतीकरणाचा कार्यक्रम घेण्याच्या सूचना केल्या आहेत.

त्यानुसार ही प्रक्रिया राबवण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले ऑनलाइन अर्ज करण्यासाठी १ जुलैला वयाची १८ वर्षे पूर्ण होणाऱ्या युवकांना मतदार यादीत नाव नोंदवता येणार आहे. मतदार यादीत नाव आहे किंवा कसे याबाबत www.nvsp.in या संकेतस्थळावर किंवा वोटर हेल्पलाइन या मोबाईल पवर संपूर्ण नाव, वय, लिंग, राज्य, जिल्हा आणि विधानसभा मतदारसंघ ही माहिती भरल्यानंतर समजणार आहे मतदार यादीत नोंदणी करण्यासाठी अर्ज क्रमांक सहा भरावा. पत्ता बदलण्यासाठी आठ अ, तर नाव वगळण्यासाठी सात क्रमांकाचा अर्ज भरावा तसेच जवळील मतदान केंद्रावर बीएलओ यांच्याकडे सुद्धा अर्ज दाखल करता येईल तसेच ींशिी.शलळ.सीं.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने मतदार यादीत नाव नोंदवण्यासाठी अर्ज करता येणे शक्य आहे. मतदार यादी अधिक अचूक करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि राजकीय पक्षाचे प्रतिनिधी मतदारांच्या घरोघरी जाऊन मतदान यादीची पडताळणी करणार आहेत.

# किसनवीर साखर कारखान्याला लवकरच राज्य सहकारी बँकेचे कर्ज होणार मंजूर

**वाई :** करोडो रुपयांची देणी आणि कर्जाच्या ओझ्यात दबलेल्या किसनवीर साखर कारखान्याला लवकरच राज्य सहकारी बँकेचे मंजूर कर्ज उपलब्ध होईल.या रकमेतुन कारखान्याची बरीचशी देणी,कर्ज 'ओटीएस' पद्धतीने देऊन कारखाना रुळावर आणण्याच्या प्रक्रियेला वेग येणार आहे.सभासद, शेतकऱ्यांचा विश्वास सार्थ ठरेल अशीच कामगिरी करून दाखवू असे ठाम मत किसनवीरचे चेअरमन आ.मकरंद पाटील यांनी व्यक्त केले.

बावधन येथील मोरेश्वर वॉर्ड मध्ये आ.मकरंद पाटील यांनी मंजूर केलेल्या सुमारे सव्वा कोटी रुपयांच्या रस्त्यांचे डांबरीकरण,काँक्रीटीकरण शुभारंभप्रसंगी आ.पाटील बोलत होते.यावेळी,कृषीभूषण शशिकांत पिसाळ,दिलीपराव पिसाळ, मदन भोसले,विक्रम पाटील,राजेंद्र कदम,अंकुश कुंभार,सरपंच शुभांगी कांबळे,उदयसिंह पिसाळ यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

आ. पाटील म्हणाले, किसनवीर कारखाना वाचविण्यासाठी कोणत्या गोष्टींचा त्याग केला,कशावर पाणी सोडले यापेक्षा सहकारातील संस्था टिकवण्यात आपण यशस्वी होतोय याचे मोठे समाधान आहे. मतदारसंघात चांगले अंतर्गत तसेच बाह्य रस्ते देण्यात आपण यशस्वी झालो. लोकसभेत प्रणित पाटील आणि सहकाऱ्यांनी केलेली कामगिरी कौतुकास्पद असून कार्यकर्त्यांनी आता विधानसभा निवडणुकीसाठी सज्ज व्हावे.

यावेळी उपसरपंच उदयसिंह पिसाळ,प्रणित पाटील,तानाजी मांढरे,तानाजी कचरे,किशोर भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. अनिकेत शिंदे यांनी प्रास्ताविक केले तर रमेश भोसले यांनी आभार मानले.यावेळी बावधन व परिसरातील ग्रामस्थ कार्यकर्ते उपस्थित होते.

मागच्या सरपंच फोडाफोडीच्या वेळी प्रणित पाटील यांनी जीवाचे रान करून सरपंच शुभांगी कांबळे यांचे अवघ्या एकाच दिवसात भाजपमधून राष्ट्रवादी मध्ये ल कमबॅक करण्यात प्रणित पाटील यांची मोलाची भूमिका वठवली होती. आजच्या कार्यक्रमात पारंपरिक जेष्ठांची मनोगते डावलून युवा कार्यकर्त्यांनी कार्यक्रम हातात घेऊन पार पाडला. प्रणित पाटील यांच्या कार्यकर्त्यांनी जोरकसपणे प्रणित पाटील यांना प्रेझेंट केले.

कमी उंचीच्या माणसावर बोलून मी त्याची उंची वाढवणार नाही, ज्याला स्वतःचा पक्ष कोणता हेच कळत नाही त्यावर मी काय बोलू असा घणाघाती टोला आ. मकरंद पाटील यांनी विराज शिंदे यांचे नाव न घेता लगावला. झाडानी' विषयावर आ. पाटील यांच्या हितसंबंधावरून विराज शिंदे यांनी प्रसारमाध्यमामध्ये रान पेटवले होते. यावर आ. मकरंद पाटील यांनी कुणा एकाच्या लाभासाठी नव्हे तर लोकांच्या मागणीनुसार काम केल्याचा पुनरुच्चार केला.

# शिरवळ हायवेवर दरोड्याचा प्रयत्न नाकाम

## शिरवळ पोलिसांकडून पाच जण अटक!

**शिरवळ :** खंडाळा तालुक्यातील शिरवळ येथील पुणे-बेंगळुरू हायवेवरील रामेश्वर ऍटो गॅरेजजवळ दरोड्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच जणांना गुरुवारी पहाटे शिरवळ पोलीसांनी अटक केली. त्यांच्याकडून वाहनासह ३ लाख ५१ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी पहाटे ३.३० वाजता, शिरवळ पोलीस हवालदार नितिन नलवडे आणि त्यांच्या टीमने शिरवळ-बेंगळुरू हायवेवरील रामेश्वर ऑटो गॅरेजजवळ संशयास्पद हालचाली करणाऱ्या काही व्यक्तींना पाहिले.

पोलिसांनी ताबडतोब त्यांना रोखून चौकशी केली असता, त्यांच्याकडून काहीही समाधानकारक उत्तर मिळाले नाही. त्यानंतर पंचांच्या उपस्थितीत त्यांची झडती घेण्यात आली असता, त्यांच्याकडून लोखंडी कटर, कटावणी, मिरची पूड मिळून आले. अधिक चौकशी केली असता हे सर्व जण दरोड्याचा प्रयत्न करण्यासाठी जमले होते असे उघड झाले. त्यानुसार, आरोपी तौसीब दस्तगीर बागवान, कृष्णात प्रकाश पोतेकर, आकाश अंकुश घाडगे, विक्रम दिपक सोनवले आणि सुरज महादेव पाटील यांना अटक केली. त्यांच्याकडून वाहनासह ३ लाख ५१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीसांनी अटक केलेल्या आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम ३९९ आणि ४०२ अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

सदर कामगिरी पोलिस निरीक्षक संदीप जगताप यांच्या यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ह नितीन नलावडे , पो.ह गिरीश भोईटे, पो कॉ.सूरज चव्हाण, संग्राम भोईटे, पो.ना चालक शिंदे, होमगार्ड ननावरे,येले यांनी केली. आरोपींना नायालयात हजर केले असता न्यायालयाने चार दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.तर पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शंकर पांगारे करीत आहेत.

# देशपातळीवर नावलौकिक वाढेल असे काम करा : मकरंद पाटील

## ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामस्थांचा गुणगौरव समारंभ

**बावधन :** केंद्र सरकार आणि राज्य शासन यांच्या योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहचविण्यात ग्रामपंचायत मोलाची भूमिका बजावते.वाई तालुक्यातील ग्रामसेवकांनी कायमच हे माझं घरचे काम समजून काम केल्यानेच विविध शासकीय योजना उपक्रम राबविण्यात वाई तालुका अग्रेसर राहतो.आपल्या ग्रामसेवकांच्या कामगिरीचा आम्हाला सार्थ अभिमान असून यापुढेही आपल्या ग्रामसेवकांनी आपल्या चांगल्या कामात सातत्य ठेवून ग्रामपंचायतीचा देशपातळीवर नावलौकिक वाढवावा अशी अपेक्षा व्यक्त करून आमदार मकरंद पाटील यांनी तालुक्यात उत्कृष्ठ कामगिरी केलेल्या ग्रामसेवक,सरपंच उपसरपंच,सदस्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.

वाई पंचायत समिती मार्फत शिक्षण विभाग,बचत गट व ग्रामपंचायत स्तरावर विशेष कौतुकास्पद कामगिरी केलेल्या केंद्र,राज्य,जिल्हा व तालुका पुरस्कारप्राप्त ग्रामसेवक,सरपंच,उपसरपंच,सदस्य ग्रामस्थ व बचत गटांचा आमदार मकरंद पाटील यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी वाई पंचायत समिती गट विकास अधिकारी विजयकुमार परीट,नाम फाउंडेशन समन्वयक बाळासाहेब शिंदे, ज्ञानदीप को ऑप बँक सचिव चंद्रकांत शिंदे,विस्तार अधिकारी रुपेश मोरे,राहुल हजारे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.आमदार मकरंद पाटील यांची सरपंच,जिल्हा परिषद सदस्य ते आमदार या राजकीय कारकिर्दीच्या आठवणींना उजळणी देत वैयक्तिक फायदा बाजूला ठेवून लोक सहभाग व लोकचळवळीच्या माध्यमातून विकास कामे उभी केल्यास सर्वसामान्य जनता आपल्या पदरात भरभरून दान टाकते,श्रमदानातून दुष्काळ परिस्थितीवर मात करता येते, हे पुरस्कार प्राप्त ग्रामसेवक, ग्रामस्थ, सरपंच, उपसरपंच, सदस्य व ग्रामपंचतीने सिद्ध केलेल्या कर्तृत्ववाची इतरांनी अवलोकन करत आपल्या गावचे, तालुक्याचे नाव राज्य व देशपातळीवर रोशन करावे असे आवाहन केले.

प्रास्तविकात गटविकास अधिकारी परीट यांनी लोकसहभागातून गावागावात जलसंधारण कामाची व्याप्ती वाढवून अटल भूजल योजना प्रभावीपणे राबविली जाण्याची अपेक्षा व्यक्त केली.तसेच सामूहिक प्रयत्नातून वाई तालुका १००% सुजलाम सुफलाम करण्याचे आवाहन कर्मचारी सरपंच उपसरपंच व उपस्थित ग्रामस्थांना केले.

वेळे, कवठे, केंजळ या गावांनी लोकसहभागातून जलसंधारण कामाची महुर्तमेढ रोवली.यासाठी नाम फाउंडेशन यांनी मशीन व ज्ञानदीप को ऑप बँकेने अर्थसहाय्य केले तर १००% वसूली करून शेलारवाडी, परतवडी किरोंडे, विठ्ठलवाडी, दरेवाडी, कोंढवली, भिवडी, बलकवडी नागेवाडी, अनपटवडी, धोम पुनवर्सन, वेरुळी, दह्याट, दसवडी, चांदवडी पुनर्वसन, आनंदपूर या ग्रामपंचायत पुरस्काराच्या मानकरी ठरल्या तर नानाजी देशमुख राष्ट्रीय गौरव ग्रामसभा केंद्रस्तर पुरस्कार -ओझर्डे, दीनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण केंद्रस्तर पुरस्कार -देगाव,जिल्हास्तर स्मार्ट ग्राम पुरस्कार-शेलारवाडी या ग्रामपंचायतीने उत्कृष्ट कामगिरी करत पुरस्कार



# रेशन दुकानदारांचे तहसील कार्यालयासमोर आंदोलन

**सातारा :** रेशन दुकानदार, केरोसिन परवानाधारक दुकानदार यांच्या विविध प्रलंबीत मागण्या व अडचणी बाबत शासनाकडून तात्काळ कार्यवाही व्हावी, यासाठी सातारा तालुका रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक संघटनांनी सातारा तहसीलदार कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. दरम्यान, आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदार नागेश गायकवाड यांना देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रेशन दुकानदार केरोसीन परवानधारक दुकानदार यांच्या प्रलंबित कमिशन वाढीचा प्रस्ताव त्वरित मंजूर करून धान्य वाटपाचे कमिशन वाढवून मिळावे, त्याचबरोबर धान्य वाटपाचे कमिशन हे दरमहा पाच तारखेपर्यंत मिळावे आणि रेशनिंग धान्य वाटपाबरोबरच डाळी खाद्यतेल साखर इतर जीवनावश्यक वस्तू विक्री करण्यास शासनाकडून मिळाव्यात. एफसीआय गोडाऊनमधून येणारे धान्य शासनाच्या नियमाप्रमाणे जेवढ्या वजनाच्या आहे तेवढेच मिळावे, ग्राहकाला धान्य देतेवेळी धान्याची नासाडी होते त्यामुळे १०० किलोमागे १ किलो धान्याची सुट पूर्वीप्रमाणे मिळावी. तसेच प्रत्येक धान्य दुकानदारास ई-केवायसी करण्यासाठी १० रुपये मेहनताना मिळावी, अशा विविध मागण्या सातारा तालुका रास्त भाव धान्य दुकानदार व केरोसीन परवानाधारक संघटनेकडून करण्यात आल्या आहेत.

या आंदोलनात संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत शेटे, प्रमोद तपासे, विजय यादव, सागर साळुंखे यांच्यासह तालुक्यातील सर्व दुकानदार सहभागी झाले होते.

# तर.... माण खटाव सुद्धा महाबळेश्वर सारखा हिरवागार दिसेल : उज्वला गाडेकर

**वडूज :** माण खटाव तालुक्यांचा सर्वत्र दुष्काळी तालुके म्हणून उल्लेख होत असला तरी येथील जनता व शेतकऱ्यांनी आपापल्या शेती व जागेत तसेच सार्वजनिक क्षेत्रात मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड आणि संवर्धन केलं तर येत्या काही वर्षात दुष्काळी हा कलंक पुसून माण खटाव तालुके महाबळेश्वर सारखं हिरवं गार दिसतील. असा आत्मविश्वास माण खटाव प्रांत अधिकारी उज्वला गाडेकर यांनी आयोजित कार्यक्रमात व्यक्त केला.

सेट्रिज सामाजिक संस्थेच्या वरूड ता खटाव येथील फळझाड लागवड शेतकरी प्रशिक्षणाला प्रांत अधिकारी उज्वला गाडेकर यांनी सदिच्छा भेट



दिली. सेट्रिज संस्थेच्या माध्यमातुन मागील दोन महिन्यांपासून शेतकऱ्यांसाठी फळबाग लागवड प्रशिक्षण सुरु असून या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण घेतलेल्या माण, खटाव व कोरेगाव या भागातील असंख्य शेतकऱ्यांना सुमारे ३ लाखांहून अधिक फळ झाडांचं मोफत वाटप करण्यात येणार आहे. या अनुषंगाने प्रांत अधिकारी यांनी सविस्तर माहिती घेतली.

दरम्यान ही सर्व रोपं उत्तम गुणवत्तेची असल्याचे मत व्यक्त करून,जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी याचा फायदा घेऊन माण-खटावचा दुष्काळी कलंक पुसुन महाबळेश्वर सारखा हिरवागार आपला तालुका करण्याचं आवाहन केलं. येथील शेतकऱ्यांशी संवाद साधताना या कामी प्रशासकीय सर्व मदत या प्रकल्पास होईल असेही यावेळी उज्वला गाडेकर म्हणाल्या.

कार्यक्रमास सेट्रिज टीमचे आबा लाड, ऋषभ मांडवे, राज्य समन्वयक चैतन्य जोशी, इतर पदाधिकारी तसेच मंडल अधिकारी मुल्ला मॅडम, तलाठी तडवळेकर,ग्रामसेवक नरेंद्र जगदाळे, उपसरपंच सदाशिव माने, पोलीस पाटील अण्णासाहेब जाधव, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातारा पालिकेचे आरोग्य निरीक्षक प्रवीण यादव यांच्यावर अपसंपदेचा गुन्हा दाखल

**सातारा :** सातारा पालिकेचे आरोग्य निरीक्षक प्रवीण एकनाथ यादव राहणार ३२२ धादमे कॉलनी करंजे पेठ यांच्यावर अपसंपदेचा गुन्हा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सातारा यांच्यामार्फत दाखल करण्यात आलेला आहे. या कारवाईमुळे पालिकेच्या आरोग्य वर्तुळात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. संबंधिताला याबाबत नोटीस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नोटीस बजावली असून सातारा पालिका प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे .

सातारा लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्याकडे यादव यांच्या विरोधात अपसंपदा कमावल्याची तक्रार दाखल झाली होती. या तक्रारीची दखल घेऊन एक जानेवारी २०१० ते ८ जानेवारी २०२० यादरम्यान वेळोवेळी झालेल्या तपासणी मोहिमेमध्ये प्रवीण यादव यांनी एकूण उत्पन्न स्त्रोताच्या २८% अधिक संपत्ती गैर मार्गाने मिळवल्याचे स्पष्ट झाले आहे . ही अपसंपदा ११ लाख सत्तर रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक सचिन राऊत करत असून सातारा शहर पोलीस ठाण्यात यासंदर्भात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

पाच वर्षांपूर्वी सातारा पालिकेत अडीच लाख रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी उपमुख्याधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता त्यावेळी ज्या तीन आरोग्य निरीक्षकांची चौकशी झाली त्यामध्ये प्रवीण यादव यांचा समावेश होता या प्रकरणात त्यांची न्यायालयात चौकशी सुरू होती त्या माध्यमातून यादव सतत चौकशीच्या फेऱ्यांमध्ये होते अँटी करप्शनचे पोलीस निरीक्षक विक्रम पवार यांनी सरकार फिर्यादीवरून आरोपी यांचे विरुद्ध अपसंपदा बाळगल्याप्रमाणे सातारा शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा क्रमांक ५७५/२०२४ नुसार कारवाई केली आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# निवडणुकीपूरती घोषणाबाजी नाही कायम विकासालाच प्राधान्य : आ. बाळासाहेब पाटील

## किवळ - शामगाव रस्त्याचे भूमिपूजन

**मसूर :** पाणी प्रश्नाच्या वल्गना करीत निवडणुकीपुरते पावसाळ्यात छत्री उगवतात. त्याप्रमाणे काहीजण येतात. मोठमोठ्या घोषणाबाजीत आश्वासने देतात निघून जातात. आम्ही सदैव सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी कायम विकास कामाला प्राधान्य देतो अशी स्पष्टोक्ती माजी सहकारमंत्री, आमदार बाळासाहेब पाटील यांनी किवळ ता. कराड येथे किवळ - शामगाव रस्त्याच्या भूमिपूजन प्रसंगी बोलताना केली. आमदार बाळासाहेब पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर झालेल्या किवळ-शामगाव रस्त्याचा भूमिपूजन समारंभ आमदार पाटील यांचे शुभहस्ते करण्यात आले. जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व अर्थ समिती सभापती मानसिंगराव जगदाळे, सह्याद्री कारखान्याचे संचालक लालासाहेब पाटील, फॉरेस्ट ऑफिसर तुषार नवले, राष्ट्रीय कार्यकारी सदस्या सौ. संगीता साळुंखे, डॉ.विजय साळुंखे, शाखा अभियंता विक्रांत शिंदे, उपसरपंच कैलास साळुंखे आदी उपस्थित होते.

आमदार पाटील म्हणाले किवळ-शामगाव रस्त्याची मागणी अनेक वर्षापासून या परिसरातील लोकांनी केली होती. मात्र फॉरेस्ट खात्याच्या अडचणीमुळे हे काम थांबले होते. आता परवानगी मिळाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरुवात होत आहे. या रस्त्यामुळे दळणवळणाची चांगली सुविधा निर्माण होणार आहे. कराड व खटाव तालुक्यासह सातारा-सांगली जिल्ह्याला जोडणारा हा रस्ता अतिशय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यापूर्वी या रस्त्याला २० लाख रुपये निधी मंजूर झाला होता त्यामध्ये आणखी २० लाखाची वाढ होऊन या रस्त्याच्या कामासाठी ४० लाख रुपये मंजूर झाले आहेत. एक वर्षात हे काम पूर्ण होईल.

माजी सनदी अधिकारी तानाजीराव साळुंखे, माजी पंचायत समिती सदस्य डॉ विजय साळुंखे, सह्याद्रीचे संचालक लालासाहेब पाटील यांनीही मार्गदर्शन केले. माजी पंचायत समिती सदस्य डॉ विजय साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. माजी उपसरपंच सुनील साळुंखे यांनी सूत्रसंचालन केले. रामराव साळुंखे यांनी आभार मानले. रामचंद्र साळुंखे, भानुदास साळुंखे, शिवाजी साळुंखे, प्रल्हाद जाधव, कृष्णत साळुंखे, हिंदुराव नलवडे, मोहन साळुंखे, किसन पावशे, दिलीप साळुंखे, शिवाजी यशवंत साळुंखे, रामभाऊ साळुंखे, विष्णू पवार, मोहम्मद मुलाणी, शिवाजी शामराव साळुंखे, शिवाजी बाजीराव साळुंखे, महेंद्र मांडवे, संभाजी मांडवे, सौ. रेश्मा मुलाणी, श्रीमती फणसे, व्ही एम पोळ, अशोक सूर्यवंशी, बाळासाहेब जाधव, प्रल्हाद पाटील, युवराज पोळ, शरद पोळ, ज्ञानेश्वर पोळ, कॉन्ट्रॅक्टर देवानंद चव्हाण ग्रामस्थ उपस्थित होते.



**दळणवळणाची चांगली सुविधा असलीतरच गावांचे महत्त्व वाढत असते. किवळ-शामगाव रस्त्यासाठी बऱ्याच दिवसापासून पाठपुरावा करावा लागला. विकास कामांचा ध्यास. सचोटी व प्रयत्नांद्वारे काम पूर्ण होते. हाच कित्ता गिरवत आमदार पाटील यांनी आपल्या कामातून दर्शवून दिले आहे. शामगावला जाण्यासाठी आता जवळचा मार्ग उपलब्ध होणार आहे. - मानसिंगराव जगदाळे**

### लेकी-सुनांसाठी प्रवास सुखकर.....

**माजी सहकारमंत्री, आमदार बाळासाहेब पाटील यांनी सातत्याच्या पाठपुराव्यामुळे किवळ - शामगाव रस्त्याचे काम मार्गी लागले आहे. वर्षभरात हे काम पूर्ण होणार असल्याने किवळसह शामगाव गावासह परिसरातील लेकी-सुनांचा प्रवास रस्त्यामुळे अतिशय सुखकर ठरणार आहे. अशक्यप्राय वाटणारे रस्त्याचे काम कोणी पूर्ण केले याची जाणीव या परिसरातील जनतेने ठेवावी. - सौ. संगीता साळुंखे**

### ज्येष्ठ नेते स्व.पी.डी. पाटील यांची दोन्ही स्वप्ने पूर्णत्वास....

**ज्येष्ठ नेते आदरणीय स्व पी.डी. पाटील यांनी कराड उत्तर मतदार संघाचा सर्वांगीण विकास करताना मसूरच्या पूर्व भागाला पाणी व किवळ-शामगाव रस्त्याचे स्वप्न होते. धनगरवाडी - हणबरवाडी पाणी योजनेमुळे मसूर पूर्व भागाला पाणी मिळणार आहे. किवळ-शामगाव रस्त्यामुळे दळणवळणाची चांगली सुविधा होणार आहे. दोन्ही स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आमदार बाळासाहेब पाटील यांच्याकडे अनेकांनी पाठपुरावा केला होता. आज त्याला यश आले आहे.**

# राज्यातील स्वच्छ सुंदर बसस्थानक स्पर्धेत मेढा प्रथम

## फलटण, दहीवडी, कराड, औंध, पुसेसावळी ही बक्षीस पात्र

**सातारा :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून घेण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत राज्यात 'क' वर्गामध्ये सातारा विभागातील मेढा बसस्थानकाने बाजी मारली असून राज्यात प्रथम क्रमांक आला आहे. प्रथम क्रमांकासाठीचे १० लाख रुपयांचे बक्षीस त्यांना मिळणार आहे.

मुख्यमंत्री तथा राज्य परिवहन महामंडळाचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून दि.१ मे २०२३ ते ३० एप्रिल २०२४ या कालावधीत महामंडळाच्या सर्व बसस्थानकामध्ये हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियान राबवण्यात आले होते. यामध्ये लोकसहभागातून बसस्थानकाचा विकास या संकल्पनेवर आधारीत हे अभियान राबविण्यात आले होते. नागरिकांच्या सहकार्याने बसस्थानक व बसस्थानक परिसराचे सुशोभीकरण करणे, आकर्षक रंगरंगोटी, मोकळ्या जागेत बागबगीचा, वृक्षारोपण, प्रवाशांसाठी बसस्थानकावर वॉटर कूलर, घड्याळ, सेल्फी पाईंट यासह अन्य कामे करण्यात आली. मागील वर्षभर वेगवेगळ्या सर्वेक्षण समितीच्या माध्यमातून बसस्थानकांचे मूल्यांकन करण्यात आले. मूल्यांकनात दिलेल्या गुणांच्या आधारे बसस्थानकांची निवड करण्यात आली. 'क' वर्ग बसस्थानकांमध्ये राज्यात सातारा जिल्ह्यातील मेढा बसस्थानकाचा प्रथम क्रमांक आला असून या बसस्थानकाला १० लाखांचे बक्षीस मिळणार आहे.

सातारा विभागातील फलटण बसस्थानकाने 'अ' वर्गात प्रथम क्रमांक मिळवला असून या बसस्थानकालाही १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर झाले आहे. दहिवडी बसस्थानकाला तृतीय क्रमांकाचे २ लाख ५० हजार रुपये, तसेच कराड बसस्थानकाला 'ब' गटामध्ये द्वितीय क्रमांक मिळाला. असून २ लाख ५० हजार रुपयांचे बक्षीस मिळणार आहे. 'क' वर्ग गटात प्रथम आलेल्या रा.प. पुणे प्रदेशातर्फे सातारा विभागातील मेढा बसस्थानकाला प्रथम क्रमांकाचे १ लाख रुपये, औंध बसस्थानकास द्वितीय क्रमांकाचे ५० हजार रुपये व पुसेसावळी बसस्थानकाला तृतीय क्रमांकाचे २५ हजार रुपयांचे बक्षीस जाहीर झाले अशाप्रकारे सातारा विभागातील सहा बसस्थानकांना २६ लाख ७५ हजार रुपयांच्या बक्षीसास पात्र ठरल्याची माहिती राज्य परिवहन साताराचे विभाग नियंत्रक रोहन पलंगे यांनी माहिती दिली.

# राज्य महिला आयोगाकडे साताऱ्यातून २६९ तक्रारी दाखल

## तक्रारींचा लवकर निफ्टरा करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आश्वासन

सातारा : राज्य महिला आयोगाच्या वतीने सातारा जिल्ह्यात महिला आयोग आपल्या दारी राबवण्यात आलेल्या या उपक्रमांमध्ये सातारा जिल्ह्यातून वेगवेगळ्या प्रवर्गातील २६९ तक्रारी दाखल झाल्याचे राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी सांगितले. या तक्रारीपैकी बऱ्याच तक्रारींचा जागेवर निपटारा करण्याचा प्रयत्न झाला तर उर्वरित तक्रारी संदर्भात संबंधित विभागांना स्पष्ट सूचना करण्यात आल्या असल्याचे स्पष्ट केले

यावेळी पोलीस अधीक्षक समीर शेख, सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशिनी नागराजन यावेळी उपस्थित होते .

चाकणकर पुढे म्हणाल्या सातारा जिल्ह्यातून महिलांच्या वतीने कौटुंबिक छळवणुकीच्या १२५ मालमत्तेचा २१ कामावर छळ करणे याच्या एक तर इतर संदर्भातील ८९ सामाजिक ३४ अशा २६९ तक्रारी दाखल झाल्या. महिला आयोगाच्या वतीने सातारा जिल्ह्यातील महिला बालकल्याण, सातारा जिल्हाधिकारी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय, महसूल विभाग, सातारा नगरपालिका, सातारा जिल्हा रुग्णालय, समाज कल्याण विभाग अशा विविध शासकीय कार्यालयांचा आढावा घेण्यात आला. शासकीय कामाच्या ठिकाणी महिलांच्या हक्क आणि सुरक्षिततेसाठी चौकशी समिती असणे आवश्यक आहे शासकीय कार्यालयांमध्ये शंभर टक्के अशा महिला संरक्षण समिती असाव्यात या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय आणि कामगार आयुक्त कार्यालय यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत

सातारा जिल्ह्यातून १८ बालविवाह तात्काळ थांबवण्यात आले या संदर्भात पोलीस प्रशासन पातळीवर दोन तक्रारी दाखल करण्यात आलेले आहेत विधवा महिलांना पेन्शन योजना राबवण्याच्या दृष्टीनेही जिल्हा प्रशासनाला सूचना देण्यात आले असून धोरणात्मक पातळीवर निर्णय होईल यासंदर्भात काम सुरू आहे. पीसीपीएनडीटी अंतर्गत महाराष्ट्रात मुलींचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेत कमी आहे त्यामुळे खाजगी न रुग्णालयांच्या नियमित तपासण्या करण्यासंदर्भातही सूचना करण्यात आलेल्या आहेत मनोदय योजनेअंतर्गत १७६ प्रकरणे ही मार्गी लावण्यात आली असून यात बद्दलची काही प्रकरणे प्रलंबित आहेत समाजकल्याण विभागाची एकूण १० शासकीय वसतिगृह असून ८ सक्रिय आहेत नवव्या शासकीय वसतिगृहाचा ताबा घेण्यात आला असून दहाव्या वसतिगृहाचे काम सुरू आहे याशिवाय महिलांचे समुपदेशन कौटुंबिक स्वरूपाच्या तक्रारी यांच्या निवारणासाठी भरोसा असेल तसेच मिसिंग सेंटर सातारा पोलिसांच्या वतीने सक्रिय असून महाराष्ट्रात मानवी तस्करी हा एक गंभीर विषय आहे त्या दृष्टिकोनातूनही पोलिसांना सक्रिय राहण्यात आल्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

# सटाण्यात टवाळखोरांच्या उपद्रवाने नागरीक त्रस्त

**सटाणा :** शहरात सध्या टवाळखोरांचा मोठा उपद्रव वाढला असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अमरधाम रोड येथिल संतोषी माता मंदीर ते मगंल नगर पाट-कॅनॉल परिसरात रात्री उशीरापर्यंत टवाळखोरांचा मोठ्याप्रमाणात वावर वाढला असल्याने नागरी शांततेला बाधा पोहचत आहे.

या भागात रात्री उशीरापर्यंत घोळकेच्या-घोळके बसत असून रात्रीच्या वेळी कॅनॉल जवळील सार्वजनिक शौचालयात जाणाऱ्या महिलांना बघून असभ्य भाषेत टीप्पनी होत असल्याच्या तक्रारीही महिलांकडून होत आहेत. पादचाऱ्यांवर दगड-खडे-वाळू भिरकावण्याचे प्रकारही समोर आले आहेत. याच परिसरात एक पडिक बांधकाम असल्याने याठिकाणी मोठी गर्दी रात्रीच्या वेळी जमत असल्याने त्या ठिकाणी अनेक बेकायदेशीर प्रकारही चालतात.

अतिक्रमित तसेच अवैधरित्या चालणाऱ्या मांसविक्रीच्या दुकानांमधून टाकावू मांस घटक परिसरातच टाकले जातात यामुळे परिसरात मोठ्याप्रमाणात दूर्गंधी वाढली आहे.

तसेच भटके कुत्रे व उपद्रवी जनावरांचा वावरही वाढल्याने नागरीकांचे जीवित व आरोग्य धोक्यात आले आहे. कायदा सुव्यवस्थेला बाधा पोहचविणाऱ्या या असामाजिक घटकांचा तसेच नागरी आरोग्याला बाधा पोहचविणाऱ्या अवैध मांसविक्री दुकानांचा कायदेशीर बंदोबस्त पोलीस प्रशासनाने करावा अशी मागणी नागरीकांकडून होत आहे.

# श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी प्रशासन

## सज्ज - जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**सातारा :** सालाबादप्रमाणे श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा सुरू होणार आहे. दि. ६ जुलै २०२४ रोजी पालखीचे सातारा जिल्ह्यात आगमन होणार असून दि. ११ जुलै २०२४ रोजी पालखी सातारा जिल्ह्यातून सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.

पालखी सोहळ्याचा जिल्ह्यातील कार्यक्रम पुढीलप्रमाणे असणार आहे. रविवार दि. ७ जुलै रोजी लोणंद येथे दिवसभर व रात्रीचा मुक्काम असेल तर सोमवार दि. ८ जुलै रोजी सकाळचा विसावा व दुपारचे भोजन लोणंद येथे घेऊन दुपारी लोणंद येथून निघून दुपारचा विसावा चांदोबाचा लिंब येथे होईल तर मुक्काम तरडगांव येथे होणार आहे.

मंगळवार दि. ९ जुलै रोजी सकाळी तरडगाव येथून प्रस्थान होईल. सकाळचा विसावा दत्तमंदिर काळज, दुपारचे भोजन निंभोरे ओढा, दुपारचा विसावा वडजल व फलटण दूध डेअरी, रात्रीचा मुक्काम फलटण (विमानतळ). बुधवार दि. १० जुलै रोजी सकाळी फलटण येथून प्रस्थान, सकाळचा विसावा विडणी, दुपारचे भोजन पिंपरद, दुपारचा विसावा निंबळक फाटा, रात्रीचा मुक्काम बरड येथे असेल.

गुरुवार दि. ११ जुलै रोजी बरड येथून प्रस्थान, सकाळचा विसावा साधबुवाचा ओढ, दुपारचे भोजन धर्मपुरी पाटबंधारे बंगला

# शांती श्रीधर यांची रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थच्या अध्यक्षपदी निवड

पुणे: शांती श्रीधर यांची रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थ च्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. २०२४-२५ साठी ही निवड असून डिस्ट्रिक्ट गव्हर्नर शीतल शाह यांच्या उपस्थितीत २५ जून २०२४ रोजी अरोमी मेस, पुणे येथे शपथग्रहण समारंभ झाला.

नव्या संचालक मंडळात शांती श्रीधर(अध्यक्ष) ,मोहन पुजारी(नियोजित अध्यक्ष), दीपक ठक्कर (सचिव), डॉ. जे. श्रीधर (उपाध्यक्ष), नीलम बेंडे (संचालक प्रशासन), विवेक प्रकाश (खजिनदार), गिरीश कोनकर (संचालक, स्थानिक प्रकल्प), वी.एस. श्रीनिवासन (संचालक, आंतरराष्ट्रीय प्रकल्प), प्रेमा कुलकर्णी (संचालक, सदस्यता), प्रीती मस्के (संचालक, युवा), सुरेंद्र अग्रवाल (संचालक, फाउंडेशन), आणि दीप्ती पुजारी ( माजी अध्यक्ष) यांचा समावेश आहे.

माजी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रवी धोत्रे, माजी अध्यक्ष दीप्ती पुजारी, माजी सचिव शिल्पा राजे असे अनेक मान्यवर उपस्थित होते. रोटरी क्लब ऑफ पूना नॉर्थ हे

# कर्तव्यात कसूर करून सरपंच पदाचा गैरवापर केल्याबद्दल न्हावी ३२२ येथील तत्कालीन सरपंच अपात्र

**भोर -** कर्तव्यात कसूर करून सरपंच पदाचा गैरवापर केल्याबाबत न्हावी ३२२(ता.भोर) ग्रामपंचायतचे तत्कालीन सरपंच गणेश ज्ञानोबा सोनवणे यांना अपात्र ठरविण्यात आले असून याबाबतचे आदेश डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार विभागीय आयुक्त पुणे विभाग यांनी पारित केले आहेत.

कापूरहोळ (ता.भोर) येथील राजवाडा हॉटेल येथील आयोजित पत्रकार परिषदेत तक्रार अर्जदार ज्ञानेश्वर उर्फ अजय रुपचंद कांबळे (रा. न्हावी ३२२, ता.भोर, जि.पुणे) यांनी यावेळी सर्व गोष्टींचा खुलासा केला. यावेळी बळीराजा शेतकरी संघटना संस्थापक अध्यक्ष रमेश गणगे,प्रहार जनशक्ती पक्ष भोर तालुका अध्यक्ष संतोष मोहिते, संतोष पारठे, गणपत पारठे, मिलिंद तारु, जगन्नाथ सपकाळ, विजय गायकवाड, लव्हाजी मालुसरे, रामचंद्र कोंढाळकर, बाळासाहेब पवार आदी उपस्थित होते.

सन २०२१ ते २०२६ या कालावधीसाठी ग्रामपंचायत न्हावी ३२२(ता. भोर) येथे गणेश ज्ञानोबा सोनवणे हे ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून आले व त्यांनी बहुमताने ग्रामपंचायत सरपंच म्हणून पदभार स्वीकारला होता. त्यानंतर त्यांनी सरपंच पदाच्या कर्तव्यात कसूर व बेकायदेशीर कामे केल्यामुळे त्यांच्या विरोधात प्रहार जनशक्ती पक्ष भोर तालुका उपाध्यक्ष अजय रुपचंद कांबळे यांनी विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्या न्यायालयात पदाचा दुरुउपयोग केल्याबद्दल सरपंच व सदस्य पद रद्द करावे म्हणून प्रकरण दाखल केले. त्यामध्ये त्यांनी १५ वा वित्त आयोगाचा निधी हा ग्रामसभाची मंजुरी न घेता परस्पर खर्च करणे, मासिक सभा न घेणे, मनमानी कारभार करणे, ग्रामपंचायत मधील रजिस्टर मध्ये खाडाखोड करणे, शासकीय प्लॉट परस्पर विक्री करणे, बनावट ८ अ उतारे मृत्यू दाखले तयार करणे, ग्रामपंचायत कामांमध्ये भ्रष्टाचार करणे अशा अनेक मुद्द्यांसह त्यांच्या विरोधात दोषारोपपत्र ठेवण्यात आले होते.

अर्जदार यांचे विविध तक्रार अर्जाचे अनुषंगाने गटविकास अधिकारी पंचायत समिती(पुरंदर, जि.पुणे) यांच्या मार्फत प्राथमिक चौकशी करण्यात आली. त्यानंतर अनेक चौकशी अहवाल सादर झाल्यानंतर पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या निदर्शनास आले की, तत्कालीन सरपंच यांनी कर्तव्यपालनात हयगय, हलगर्जीपणा आदी स्वरुपाची कर्तव्य कसुरी केली आहे. तसेच कर्तव्यकसुरीचे स्वरुप पाहता, गणेश सोनवणे हे सध्या जरी ग्रामपंचायतीचे सरपंच पदावर कार्यरत नसले तरी, त्यांना ग्रामपंचायतीचे सदस्य पदावर कार्यरत ठेवणे उचित नसल्याने सार्वत्रिक निवडणुक २०२१ चे उर्वरित कालावधीसाठी त्यांना पदावरून काढण्यात येत असल्याचे आदेश पुणे विभागीय आयुक्त यांनी दिले आहेत. याबाबतच्या सर्व गोष्टींचा खुलासा अर्जदार अजय कांबळे आणि आदींनी आज कापूरहोळ(ता.भोर) येथील पत्रकार परिषदेत केला.

# मुंबईसारख्या मेट्रो शहरात ही जावळी बँकेने आपले स्थान टिकवले - आ. शशिकांत शिंदे

**मेढा :** स्पर्धेच्या युगातही जावली सारख्या ग्रामिण भागातील बँकेने मुंबई सारख्या शहरात स्वताचे स्थान निर्माण करून 'ग्राहक व सभासदांना अविरत व तत्पर सेवा दिल्याने जावली बँकेची विश्वासार्हता आजही टिकून आहे. मुंबई सारख्या मेट्रो शहरात आपले स्थान टिकवून ठेऊन कोरोना काळानंतर सलग तीन वर्षे तोट्यात असणाऱ्या बँकेने फिनिक्स पक्षाप्रमाणे आपली भरारी घेऊन यंदाच्या वर्षात साडे आठ कोटींचा नफा प्राप्त करून सभासद व ग्राहकांचा विश्वास यानिमित्ताने अधिक दृढ केला असल्याचे मत विधानपरिषदेचे आमदार व बँकेचे मार्गदर्शक शशिकांत शिंदे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला.

डीएमके जावळी सहकारी बँकेची एक्कावनावी वार्षिक सर्वसाधारण सभा मुंबई येथे नुकतीच संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. सभेस माजी आमदार सदाशिव सपकाळ, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष वसंतराव मानकुमरे, प्रतापगड कारखान्याचे अध्यक्ष सौरभ शिंदे, शिवसेनेचे संपर्कप्रमुख एकनाथ आंबळे, बँकेचे विद्यमान अध्यक्ष विक्रम भिलारे, उपाध्यक्ष चंद्रकात दळवी, माजी अध्यक्ष चंद्रकांत गावडे, प्रकाश मस्कर यांच्यासह अनेक मान्यवर व संचालक मंडळ उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले, कोरोना नंतर बँक अडचणीत आली होती मात्र योग्य व अनुभवी संचालकांच्या हातात बँकेची सुत्रे असल्याने आर्थिक संकटातून बँक बाहेर आली.

राजकारण विरहित बँकेचे कामकाज सूरू असून आम्ही सर्व नेतेमंडळी येथे नाममात्र आहोत,

गतवेळी प्रमाणेच यापुढील सर्व निवडणुका बिनविरोध करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. माजी आमदार सदाशिव सपकाळ बोलताना म्हणाले, बँकेची निवडणुक बिनविरेध करून सभासदांनी संचालक मंडळावर जो विश्वास दाखविला तो विश्वास बँकेला पुन्हा नफ्यात आणून सार्थ ठरवून दाखवला, बँकेच्या पुढील वाटचालीसाठी सर्वांनी सहकार्य करावे असेही ते म्हणाले, बँकेचे मार्गदर्शक वसंतराव मानकुमरे बोलताना म्हणाले, बँकिग क्षेत्रात स्पर्धात्मक आव्हाने उभी ठाकलेली आहेत. कोरोना सारख्या अडचणीच्या काळात बँक काही प्रमाणात मागे गेली, तसेच तीन वर्षात झालेला तोटा हा तांत्रिकदृष्ट्या झालेला तोटा होता, आज साडे आठ कोटींचा निवळळ नफा मिळवून बँकेने केलेली प्रगती कौतुकास्पद आहे, यापुढे भावनिकतेला महत्व न देता कतृत्वाला महत्व देऊन बँकेच्या मुख्य शाखेची जागा बदलण्याची सुचनाही त्यांनी यावेळी केली, तसेच बँकेच्या विस्तारीकरणाचा विचार कतून लवकर भरती करावी, बँकेचे अध्यक्ष विक्रम भिलारे बोलताना म्हणाले, तोट्यात गेलेल्या बँकेला पुन्हा नफा मिळवून देण्यासाठी संचालक मंडळाबरोबरच बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांचे मोलाचे येगदान असल्याचे त्यांनी नमूद करून बँकेचा व्यवसाय अधिकाधिक वाढवून बँकेला शेड्युल बँकेचा दर्जा मिळण्यासाठी आम्ही प्रयत्नशिल असल्याचे सांगितले, यावेळी प्रतापगडचे अध्यक्ष सौरभ शिंदे यांच्यासह अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त केली. प्रारंभी ह.भ.प दत्तात्रय महाराज कळंबे यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्ज्वलन करण्यात आले.

संचालकांनी सभेचे नोटीस वाचन केले. यावेळी बँकेच्या वतीने सर्व उपस्थित मान्यवरांचा सत्कार

करण्यात आला. यावेळी सभासदांच्या विविध प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देखील संचालकांकडून देण्यात आली.

संचालक वसंत तरडे यांनी सुत्रसंचालन केले तर बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ईश्वरदास लालवाणी यांनी आभार मानले. यावेळी बँकेचे सर्व संचालक मंडळ, कमचारी, सभासद, खातेदार उपस्थित होते

# भोरला स्वस्त धान्य व केरोसीन परवानाधारक संघटनेचे धरणे आंदोलन

## विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये त्रिस्तरीय आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा

**भोर -** आपल्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी भोर तालुका स्वस्त धान्य व केरोसीन परवानाधारक संघटनेच्या वतीने गुरुवार (दि.२७) रोजी राजवाडा चौकात एक दिवसीय धरणे आंदोलन केले.यावेळी प्रलंबित मागण्या मान्य न झाल्यास विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये त्रिस्तरीय आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला.

भोर येथील राजवाडा चौकात सर्व संघटनेच्या पदाधिकारी व सर्व दुकानदार यांनी एकत्र येऊन आंदोलन करीत जोरदार घोषणा दिल्या. राज्य शासनाने संघटनेच्या विविध मागण्यांचा सहानुभूतीने विचार करून त्या पूर्ण कराव्यात अशी मागणी एक मुखाने केली गेली. राज्यातील रास्त भाव दुकानदारांच्या मार्जिनमध्ये आजच्या महागाई निर्देशांकानुसार किमान १०० रुपये प्रतिक्विंटल इतकी वाढ करण्यात यावी. शासकीय धान्य गोदामातून देण्यात येणारे अन्नधान्य हे केवळ जूट बारदान मध्येच देण्यात यावे.५० किलोच्या प्लास्टिक पिशवीमध्ये अन्नधान्य देण्यात येऊ नये. संपूर्ण राज्यांमध्ये अंत्योदय योजनेतील सात पेक्षा अधिक सदस्य असणाऱ्या साधारण ९० हजार शिधापत्रिका अंत्योदय ऐवजी प्राधान्य कुटुंब योजनेत वर्ग करण्यात याव्यात या आणि इतर मागण्यांचे निवेदन अप्पर तहसीलदार पुनम अहिरे,नायब तहसीलदार महसूल अजिनाथ गाजरे यांना देण्यात आले.यावेळी जिल्हाध्यक्ष सोमनाथ वचकल, तालुकाध्यक्ष मनोज खोपडे,अब्दुल शेख,बबनराव भगत,नरेंद्र मोदी, शंकरराव खोपडे, प्रदीप मोहिते, कुमार साळुंखे, शेखर पिसाळ, सोमनाथ निगडे, हनुमंत पवार, मिलिंद आवाळे आदींसह रेशनिंग दुकानदार उपस्थित होते.



# वळतीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याला भाविकांची अलोट गर्दी

**वळती :** वळती (ता. आंबेगाव )येथे स्वर्गवासी कु.विशाल बाळासाहेब गायकवाड यांचे पुण्य स्मरणानिमित्त संकल्पपूर्ती १०८ व्या श्रीमद् भागवत कथाज्ञानयज्ञ सोहळ्याला भाविक भक्तांची अलोट गर्दी होत आहे.

सोमवारी (दि.२४ ) रोजी या कथा ज्ञान यज्ञ सोहळ्याला उत्साहात प्रारंभ झाला. भागवताचार्य कथाकार ह.भ .प. बाळासाहेब महाराज गायकवाड यांच्या सुश्राव्यवाणीतून कथा सांगितली जात आहे . कथा श्रवणाला पंचक्रोशीतून भाविकांची मोठी गर्दी होत आहे . या कार्यक्रमाला महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होत आहे .

गुरुवारी (दि. २७ ) रोजी श्रीकृष्ण जन्मोत्सव कथेला भाविकांची अलोट गर्दी झाली . यावेळी पात्र रुपाने,वासूदेव, देवकी, कन्हैय्या यांची पात्रे भाविकांना भावली . महीला भाविकांनी फुगड्या खेळून,गाणी गाऊन आनंद व्यक्त केला.

कथे नंतर उपस्थित भाविकांना दररोज महाप्रसादाचे वाटप केले जात आहे.

रविवार (दि. ३० ) सकाळी वाजता ह .भ .प . निवृत्ती महाराज देशमुख ( इंदूरी ) यांचे काल्याचे कीर्तनाने या सोहळ्याची सांगता होणार आहे .

श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ सोहळ्यात भागवत महात्म्य श्री संत विदुर कथा, श्री नरसिंह अवतार, श्री कृष्ण जन्मोत्सव, श्री गोवर्धन पूजा, श्रीकृष्ण रुक्मिणी विवाह, आदी कथा सांगितल्या जाणार आहेत

## ज्वेलर्सच्या दुकानातुन पन्नास हजाराच्या गंठणची चोरी

**सातारा :** येथील जुनी भाजी मंडईतील एका ज्वेलर्सच्या दुकानातून अज्ञात दोन चोरट्यांनी सुमारे ५० हजार रुपये किमतीचे मिनी गंठण हातोहात चोरून नेले. ही घटना दि. २४ रोजी सकाळी अकरा वाजता घडली.

शंकर जयसिंग शेळके (वय ४३, रा. शेळकेवाडी, ता. सातारा) यांचे जुनी भाजी मंडईत वाघेश्वरी ज्वेलर्स या नावाचे दुकान आहे. त्यांच्या दुकानात दोन अनोळखी व्यक्ती आल्या. त्यावेळी त्यांचा मुलगा साहील हा दुकानात होता. त्याला दुकानाच्या गल्ल्यातील सुट्टे पैसे दाखव, असे सांगून गल्ल्यात ठेवलेली ५० हजारांची सोन्याची पट्टी असलेले मिनी गंठण त्या दोघांनी चोरून नेले. हा प्रकार निदर्शनास आल्यानंतर शंकर शेळके यांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात दोन अज्ञात चोरट्यांवर चोरीचा गुन्हा दाखल केला. याबातचा अधिक तपास हवालदार भिंगारदिवे हे करीत आहेत.

## सिगारेटसाठी पैसे न दिल्याने मारहाणप्रकरणी तिघांवर गुन्हा

**सातारा :** सिगरेटसाठी पैसे न दिल्याने राजू ईबारत हुसेन बागवान (वय २०, रा. कोडोली, सातारा) याला व त्याच्या मित्रांना मारहाण करण्यात आली. याप्रकरणी सातारा शहर पोलिस ठाण्यात तिघांवर गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना दि. २४ रोजी दुपारी गोडोली नाका येथे घडली.

शुभम विचुरे, अथर्व कुंभार, दीपक जावळे अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. राजू बागवान याने संशयितांना सिगरेटसाठी पैसे न दिल्याने दीपक जावळे याने त्याच्या कपाळावर दगड मारला. यात तो जखमी झाला. तर इतरांनी बागवान याच्या मित्रांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकारानंतर बागवान याने सातारा शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. संशयितांचा पत्ता त्याला माहीत नसून, हवालदार जाधव हे अधिक तपास करीत आहेत.

## दोन गटातील मारामारी प्रकरणी आठ जणांवर गुन्हा

### राजवाडा चौपाटीवरील व्हीडीओ व्हायरल प्रकरण

**सातारा :** येथील राजवाडा चौपाटीवर दोन गटांत मारामारी करणाऱ्या तरुणांचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शाहूपुरी पोलिसांनी आठ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल केला.

प्रतापसिंह उद्यानामध्ये रिमोट कंट्रोलच्या गाडीमध्ये बसण्याच्या कारणावरून बेकायदेशीर जमाव जमवून तरुणांच्या दोन गटांत रविवारी मारामारी झाली होती.

प्रमोद सोमनाथ रासकर (रा. सदर बाझार, सातारा), अमित शिवाजी जाधव (रा. मंगळवार पेठ, सातारा), विवेक रवींद्र गंगावणे (रा. माजगावकर माळ झोपडपट्टी), रोशन शिवाजी करंडे (रा. सदर बझार, सातारा), गौरव प्रल्हाद आवळे (रा. माजगावकर माळ झोपडपट्टी), अजय विजय गोळे, अनिल हणमंत शिंदे, शशिकांत ऊर्फ सागर रमेश गलांडे (सर्व, रा. जकातवाडी, ता. सातारा) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी हवालदार स्वप्नील कुमार पवार यांनी फिर्याद दिली आहे. या आठ जणांनी बेकायदा जमाव जमवून राजवाड्यावर मारामारी केली. त्यामुळे शांततेचा भंग झाला. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर शाहूपुरी पोलिसांनी संशयितांना शोधून पोलिस आणले. त्यानंतर त्यांच्यावर कारवाई केली. महिला हवालदार यादव या अधिक तपास करीत आहेत.

## उदयनराजे यांच्या मिरवणुकीतील साखळी चोर स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात

### २७ लाख ७८ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**सातारा :** खासदार उदयनराजे भोसले यांच्या विजय मिरवणुकीमध्ये अज्ञात चोरट्यांनी सोन्याचे दागिने लांबवले होते.या मिरवणुकीतील २७ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल गायब झाला होता. चार सोनसाखळी चोरी प्रकरणांमध्ये स्थानिक गुन्हे शाखेने पाच जणांना अटक केली असून त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरली स्कॉर्पिओ आणि मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

बाबासाहेब महादेव गायकवाड राहणार वेळी तालुका पाथर्डी जिल्हा नगर, रामदास सोमनाथ घुले राहणार माळेगाव चकला तालुका शिरूर जिल्हा पुणे, सचिन काळू पवार राहणार आनंदनगर तालुका पाथर्डी जिल्हा नगर, नितीन शिवाजी धोत्रे राहणार नाथ नगर तालुका पाथर्डी जिल्हा नगर, अर्जुन लक्ष्मण मासाळकर राहणार वाळूंज तालुका पाथर्डी जिल्हा नगर यांना अटक करण्यात आली आहे. या पाच जणांनी सातारा व फलटण येथे सोनसाखळी चोरीचे तीन गुन्हे केल्याचे सांगितले. गुन्ह्यात चोरीस गेलेले चालू बाजारभावाप्रमाणे २८ तोळे दागिने १२ हजार रुपये रोख व गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पिओ असा २७ लाख ६६ हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर यांना विश्वसनीय बातमीदाराकडून पोलीस अभिलेखा वरील आरोपी बाबासाहेब गायकवाड व त्याचे पाच साथीदार दिनांक ४ जून रोजी उदयनराजे भोसले यांच्या विजय रॅलीमध्ये सहभागी झाले होते आणि ते सर्वजण सातारा बस स्थानक परिसरात वावरत आहेत अशी माहिती मिळाली त्यानुसार सहायक पोलीस निरीक्षक रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक विश्वास शिंगाडे, आणि त्यांच्या पथकाने त्यांना बस स्थानक परिसरातून ताब्यात घेतले आणि त्यांच्याकडे कसून चौकशी केली असता त्यांनी या गुन्ह्यांची कबुली दिली. नोव्हेंबर २०२२ पासून स्थानिक गुन्हे शाखेने दरोडा जबरी चोरी घरफोडी इतर चोरी असे २८९ गुन्हे उघड केले. आतापर्यंत ४ कोटी ६५ लाख ८६ हजार ९०० रुपयाचे ६ किलो ६६२ दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

# वरंधा घाट रस्ता अवजड वाहनांसाठी दोन महिने बंद

भोर - वरंधा घाट रस्ता सुरक्षतीतेच्या दृष्टीने वाहतुकीसाठी २७ जून ते ३१ ऑगस्ट या दोन महिन्याच्या कालावधीत अवजड वाहनांसाठी रस्ता बंद राहणार आहे. तसेच भारतीय हवामान खात्याने अतिवृष्टीबाबतचा रेड अर्लट,ऑरेंज अलर्ट दिल्यास त्या कालावधीत सर्वप्रकारच्या अवजड, मध्यम व हलक्या वाहनांच्या वाहतुकीसाठी वरंधा घाट रस्ता बंद करण्यात येणार आहे. या दोन महिन्याच्या कालावधीत हवामान खात्याने सदरचे लर्ट न दिल्यास अवजड वाहने वगळता सर्व प्रकारच्या वाहनांना रस्ता खुल्ला असणार आहे.

वरंधा घाटातील वाघजाई मंदिरा जवळ १९ जून रोजी झालेल्या जोरदार पर्जन्यवृष्टीमुळे दरड कोसळून रस्ता खचला होता. त्यामुळे या ठिकाणी रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत अरुंद व धोकादायक झालेला होता. २२ जून रोजी उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे यांच्यासह निवासी नायब तहसीलदार, पोलिस निरीक्षक, उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी वरंधा घाटाची संयुक्त पाहणी केली असता आठवड्यात झालेल्या जोरदार पर्जन्यवृष्टीमुळे दरड कोसळून रस्ता खचलेला दिसून आला तसेच या ठिकाणचा रस्ता अरुंद आहे. एका बाजूस प्रचंड उंचीचा धोकादायक कडा असून, त्यावरून डोंगरावरील दगड, दरड खाली कोसळण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा भाग वाहतुकीसाठी धोकादायक असल्याचे दिसून आला तसेच रस्ता खचलेल्या भागाची तातडीने दुरुस्ती होण्याबाबतचा अहवाल उपविभागीय अधिकारी राजेंद्र कचरे यांनी जिल्हाधिकारी यांना पाठवला होता.

वाघजाई मंदिराजवळ रस्ता धोकादायक झाल्याने २६ जूनपासून हा रस्ता अवजड वाहतुकीस बंद करण्यात आला आहे. वरंधा घाटातून प्रवास करणाऱ्या तसेच मालाची ने-आण करणाऱ्या व्यक्तींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने भोर हद्दीतील भोर-महाड वरंधा घाट हा रस्ता दुर्घटना टाळण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी परिपत्रक काढले आहे.

## कराडचे बेकायदेशीर कत्तलखान्यावर कारवाई करा

**सातारा :** कराड येथे मुजावर कॉलनी, सूर्यवंशी मळा, ईदगाह मैदान, कुरेशी मोहल्ला आदी आठ ठिकाणी बेकायदेशीर कत्तलखाने आहेत. या ठिकाणी यापूर्वी पोलिसांनी वेळोवेळी कारवाई करत गोमाफियांविरुद्ध अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. कराड पालिकेकडे कत्तलखाने उध्वस्त करण्यासाठी अनेकदा मागणी करून देखील कसायांना पाठीशी घालण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे. याबाबत सातारा जिल्हाधिकाऱ्यांनी गांभीर्याने घेऊन संबंधितांवर कारवाई करावी, अन्यथा जनआंदोलन करावे लागेल, असा इशारा मानद पशुकल्याण अधिकारी शिवशंकर स्वामी यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ४ मार्च २०१५ पासून गोवंश हत्याबंदी कायदा लागू करण्यात आला आहे. मात्र, सातारा जिल्ह्यातील कराड येथे वारंवार गोवंश हत्या होत आहे. हे पोलीसांच्या कारवाईवरुन लक्षात येत आहे. बेकायदेशीर कत्तलखान्यात, गाई, बैल, वासरे, म्हैस, रेडा यांच्या मोठ्या प्रमाणात कत्तली करण्यात येत आहेत. याबाबत अनेकदा पोलिसांनी कारवाई केली तरीही ते थांबले जात नाहीत. म्हणून याबाबत जिल्हाधिकारी, कराड नगर परिषद यांना निवेदन दिले आहे, त्यानुसार कराड येथील बेकायदेशीर कत्तलखाने उध्दवस्त करावेत. पण अद्यापही कोणतीही कारवाई होत नाही. कारण कराड नगरपरिषद व कत्तलखाने यांचे काहीतरी लागेबंध असल्यामुळेच ही कारवाई होत नाही. त्यामुळे आज पुन्हा एकदा निवेदन देवून कराड येथील सर्व बेकायदेशीर आठ कत्तलखान्यावर कारवाई करावी. हे कत्तलखाने उध्दवस्त न झाल्यास उच्च न्यायालयात याचिका दाखल करत कराड शहरात मोठे जनआंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी दिला. दरम्यान, या प्रकरणी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे जिल्हाधिकाऱ्यांनी टोचले कान

## ठेकेदारावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा अन्यथा महामार्ग रोखण्याचा इशारा

**सातारा :** पुणे-बंगलोर राष्ट्रीय महामार्गाचे शेंद्रे ते कागल या दरम्यान रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू आहे. या कामांमध्ये ठेकेदाराचा गजब कारभार पाहायला मिळत आहे. त्याच्या गलथान कारभारामुळे अनेकांचे जीव जात आहेत. भरतगाव येथे रस्त्याच्यामधील दुभाजक फोडून केलेल्या उपक्रमाच्या विरोधात भरतगाव ग्रामस्थ आक्रमक झालेले असून त्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे संबंधित ठेकेदारावर गुन्हा दाखल करावा अन्यथा रास्ता रोको करू, असा इशारा दिला आहे. तसेच सर्व्हिस रस्ता सुरू करण्यात यावा, अशी मागणी केली आहे. यावरून जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी लगेच फोन लावून संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची कान उघडणी केली. तर पोलीस अधीक्षक समीर शेख यांनीही भरतगाव ग्रामस्थांना कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांना भरतगाव येथील ग्रामस्थांनी भेट घेऊन महामार्गाच्या कामाचे पाढे वाचले. त्यानंतर जिल्हाधिकारी डूडी यांनी लगेच संबंधित विभागाचे अधिकारी यांना फोन लावून सुनावले. दरम्यान, ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षक समीर शेख यांची ही भेट घेतली. त्यांनी ही संबंधित विभागाचे अधिकारी, ठेकेदार यांची व्हीसी घेतो त्यांना सूचना देतो असे आश्वासन दिले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या भरतगाव ते बोरगाव ता. जि. सातारा येथील महामार्ग रुंदीकरणाचे काम सुरु असून त्याकरीता रस्ते बांधकाम कंत्राटदाराने चुकीच्या पद्धतीने पर्यायी रस्त्याचे नियोजन केल्यामुळे गेले पंधरा दिवसात भरतगाव हद्दीत असलेल्या अरुंद पुलावर मोठ्या प्रमाणात अपघात झालेले आहेत. बुधवार दि. १९रोजी भरतगाव येथील सेवानिवृत्त शिक्षक भाऊसाहेब आण्णा शेडगे यांचा माईल स्टोन नंबर एल एच एस ७२१+ ५१६ या अरुंद पुलावर अपघाती मृत्यू झालेला आहे. महामार्गावरील दुतर्फा वाहतूक चुकीच्या पद्धतीने एकेरी मार्गीकेवर वळविण्यात आलेली आहे. त्यामुळे रस्ता अरुंद होऊन अपघातांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. दोन्ही बाजूंचे सेवा रस्ते गेले सहा महिन्यांपासून खोदकाम करून वाहतुकीस पूर्णपणे बंद केल्यामुळे भरतगाव व भरतगाववाडी येथील शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी जाताना अपघात होऊन शेतकऱ्यांचे जीव जात आहेत.

एकेरी वाहतुकीचे ठिकाणी दिशादर्शक सूचनाफलक लावणे गरजेचे असताना आवश्यक ठिकाणी सदरचे सूचनाफलक लावलेले नाहीत. सेवा रस्ते बंद केल्यामुळे वयोवृध्द ज्येष्ठ नागरिक, शाळेचे विद्यार्थी व महिला यांना एस.टी. बसे प्रवासासाठी धोकादायक रित्या हायवेवरील पुलावर उभे राहावे लागत आहे. दहा दिवसात आपणाकडून सेवारस्ते वाहतुकीस खुले करून वाहतूक सुरळीतपणे चालू न झालेस भरतगाव व भरतगाववाडी ग्रामस्थांचे वतीने महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला आहे. या निवेदनावर सरपंच सौ. सुरेश कदम, उपसरपंच सौ. सुमन विजय शेडने यांच्यासह ग्रामस्थांनी सह्या केल्या असून ग्रामपंचायतीचा ठराव घेतला आहे.

# साखरी-चिटेघर धरण भरले जिल्ह्यात तुडुंब भरलेला पहिला प्रकल्प

पाटण, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. : मणदुरे विभागात झालेल्या दमदार पावसामुळे मणदुरे विभागाला वरदायिनी ठरणारा साखरी-चिटेघर लघुपाटबंधारे प्रकल्प बुधवारी दुपारी पूर्ण क्षमतेने भरून सांडव्यातून मोठ्या प्रमाणात पाणी वाहू लागले आहे. त्यामुळे केरा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. तालुक्यातील इतर धरणांपैकी साखरी-चिटेघर धरण हे प्रथमच भरल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

दोन वर्षांपूर्वी या विभागात झालेल्या ढग फुटीमुळे धरणात प्रचंड प्रमाणात गाळ साठला आहे. त्याचा परिणाम पाणी साठवण क्षमतेवर होत आहे. या वर्षी धरण काठावरील अनेक विद्युत पंप गाळात अडकून पडले होते. धरणाची साठवण क्षमता गाळामुळे कमी झाली असून गाळ काढल्यास पाणी साठवण क्षमता वाढणार आहे. त्यामुळे प्रशासनाने धरणातील गाळ काढण्याची गरज निर्माण झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून केरा विभागात संततधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे साखरी-चिटेघर धरण पूर्ण क्षमतेने भरले असून सांडव्यातून पाणी वाहू लागले आहे. आजच्या परिस्थितीत साखरी-चिटेघर धरणात ३ हजार ८९९.२२ सहस्त्र घनमीटर पाणीसाठा असून २०४८.६५ उपयुक्त जलसाठा आहे तर १ हजार ४४४.३२ सहस्त्र घनमीटर अचल पाणीसाठा असून संचय पातळी ६१२ मीटर आहे. धरणाची लांबी ३९५ मीटर इतकी आहे. साखरी-चिटेघर धरण पूर्ण क्षमतेने भरून सांडव्यातून पाणी वाहत असल्याने केरा नदीच्या पाणीपातळीत वाढ झाली आहे.



कोयना विभागात व मणदुरे विभागात पडणाऱ्या जोरदार पावसामुळे दोन्ही नद्यांच्या पाणीपातळीत चांगलीच वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

साखरी चिटेघर प्रकल्प गेल्या १३ वर्षांपासून पूर्ण क्षमतेने भरत असून यामुळे विभाग सुजलाम सुफलाम झाला आहे. मात्र ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी गेल्या आहेत व ज्यांनी पर्यायी जमिनी ऐवजी रोख रकमेची मागणी केली आहे अशांच्या मागण्या मात्र शासनाने अद्यापही प्रलंबितच ठेवल्या आहेत. गेल्या दोन वर्षापूर्वी झालेल्या ढगफुटीत धरणात प्रचंड प्रमाणात गाळ साचला आहे. या गाळामुळे पाणीसाठा कमी प्रमाणात उपलब्ध होऊ लागला आहे. शासनाने धरणातील गाळ काढून खोलीकरण करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**धरण तुडूंब, मात्र प्रकल्पग्रस्तांची झोळी रिकामीच**

२००० साली सुरू झालेला साखरी चिटेघर प्रकल्प २०१० साली पूर्णत्वाकडे गेला. आजतागायत १३ वर्षापासून परिसरातील सिंचन व पिण्याच्या पाण्याची सोय झाली. मात्र प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यात शासन व आजी, माजी लोकप्रतिनिधी, पदाधिकाऱ्यांना अपयशच आले आहे. अधिकारी केवळ कागदी घोडे नाचवण्यात दंग आहेत तर लोकप्रतिनिधी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केवळ आश्वासनांचे पाणी पाजत आहेत. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

**केरा नदीवर तातडीने केटी वेअर गरजेचा**

साखरी-चिटेघर या प्रकल्पासाठी ६९.८६ हेक्टर एवढे बुडित क्षेत्र असून ६६५.१३ हेक्टर एवढे संभाव्य लाभक्षेत्र आहे. साखरी २६.६१, चिटेघर २५.४३, मेंढोशी ८.६७, घाणव ३.१० हेक्टर एवढे क्षेत्र संपादित करण्यात आले आहे तर तामकणे १४४.९९, चिटेघर ८४.६३, पिंपळोशी ८५.५८, केर १००.१९, कातवडी ९९.३५, साखरी १२९.६२, देवघर २०.७७ हेक्टर एवढे लाभक्षेत्र ओलिताखाली आणण्याचे शासनाचे धोरण असून शासनाने केरा नदीवर तातडीने केटी वेअर बांधण्याची गरज निर्माण झाली आहे.